


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर




बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेसमधून सोलापूर महापालिकेची मोठी कामगिरी – १५ कोटींपैकी १२ कोटी रुपयांची वसुली पूर्ण


Volume IV Issue 52 Date 18-07-2025


## बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेसमधून सोलापूर महापालिकेची मोठी कामगिरी – १५ कोटींपैकी १२ कोटी रुपयांची वसुली पूर्ण

सोलापूर -- सोलापूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेस यामधून आर्थिक वर्षाच्या पहिल्या टप्प्यातच उल्लेखनीय अशी ₹१२ कोटींची वसुली केली आहे. प्रशासनाने दिलेले ₹१५ कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असून, या कामगिरीमुळे महापालिकेच्या महसूलात ठोस भर पडली आहे.

नगररचना विभागामार्फत नवीन बांधकाम परवानग्या, लेआऊट परवानग्या आणि विविध प्रीमियम चार्जेस संदर्भात अधिकाऱ्यांनी नियमांनुसार अंमलबजावणी करत काटेकोर व प्रभावी कारवाई केली. यामुळे अनेक बिल्डर्स व विकासकांनी स्वेच्छेने शुल्क भरत नियोजनबद्ध कामकाज सुरू केले.

या कामगिरीत उपसंचालक, नगर रचना मनीष भिष्णुरकर व त्यांच्या कार्यक्षम टीमचे मोलाचे योगदान लाभले. मा. आयुक्त यांच्या तर्फे वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शनानुसार अर्ज प्रक्रियेचे सुलभीकरण, शुल्क आकारणीची स्पष्टता आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढवण्याचे प्रयत्नही यशस्वी ठरले.

या अनुषंगाने महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी समाधान व्यक्त करत म्हटले की, "महानगरपालिकेच्या स्वराज्य निधीचे सर्वात महत्त्वाचे स्त्रोत म्हणजे मालमत्ता कर व बांधकाम शुल्क. नगररचना विभागाने दाखवलेली आर्थिक शिस्त आणि नियोजनबद्ध कामगिरी कौतुकास्पद आहे. उर्वरित ३ कोटी वसुली पूर्ण करण्यासाठीही तितक्याच जोमाने प्रयत्न व्हावेत."

महानगरपालिका येत्या काळात आणखी बांधकाम प्रकल्पांसंदर्भात मंजुरी प्रक्रिया गतीमान करणार असून, विकास शुल्क संकलनात पारदर्शकता व नियमबद्धता यांवर अधिक भर दिला जाणार आहे.